बृहन्मुंबई महानगरपालिका
परिपत्रक
2026-27

क्रमांकः साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/ 06 दि.29.10.2026

विषयः आर्थिक वर्ष 2025-26 (दिवाळी 2026) करिता महानगरपालिका कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत.

संदर्भः- मा.महानगरपालिका आयुक्त यांची मंजूरी क्र.एमजीसी/एफ/2445 दि.29.10.2026

महानगरपालिका कर्मचा-यांना सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी नियमित वेतनश्रेणीतील पूर्णवेळ महानगरपालिका कर्मचारीवृंदांना प्रत्येकी सरसकट रु.33000/- इतके सानुग्रह अनुदान देण्याचे प्रशासनातर्फे मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार सानुग्रह अनुदानाच्या अधिदानाबाबत खालील निर्देश देण्यात येत आहेत.

एक) अनुज्ञेयताः-

1) महानगरपालिका नियमित वेतनश्रेणीतील पूर्णवेळ महानगरपालिका कर्मचा-यांना सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

2) दि.1.4.2025 ते 31.3.2026 या कालावधीत प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसानुसार विविध कारणांसाठी नियुक्त करण्यात आलेले नियमित वेतनश्रेणीतील पूर्णवेळ रोजंदारीवरील, (किटकनाशक विभागातील मुषक संहारक व खारवा) मोसमी/हंगामी व खाडा बदली, तदर्थ तत्वावरील कर्मचारी, निलंबित कर्मचारी यांना यथाप्रमाण (Prorata) सानुग्रह अनुदान सोबतच्या शिघ्रगणकानुसार अनुज्ञेय आहे. (जोडपत्र अ)

3) दि.1.4.2025 ते 31.3.2026 या कालावधीतील विनावेतनी रजा, रजेविना अनुपस्थिती, अक्षमापित निलंबन कालावधी वगळता सानुग्रह अनुदान यथाप्रमाण (Prorata) अनुज्ञेय आहे.

4) निलंबन वगळता नजरचुकीने वा विनावेतनी रजा इ. कारणाने ऑक्टोबर 2026 च्या वेतन पत्रकात नियमित मासिक वेतनाची आकारणी झाली नसली तरी संबंधित कर्मचा-यास दि.1.4.2025 ते दि.31.3.2026 या कालावधीतील सेवेसाठी यथाप्रमाण (Prorata) सानुग्रह अनुदान अनुज्ञेय आहे. मात्र संगणकावर अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची आकारणी होणार नसल्याने संबंधित आस्थापनांनी

Scanned with OKEN Scanner

अशा कर्मचा-यांना देय होणा-या सानुग्रह अनुदानाचे परिगणन करुन त्वरीत संबंधित लेखा विभागाकडे पडताळणीसाठी सादर करावे.

5) दिनांक 2.4.2025 रोजी किंवा त्यानंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले / स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले / काम करण्यास वैद्यकीय कारणास्तव असमर्थ ठरविण्यात आलेले / मृत्यू पावलेले, इतर संस्थेत प्रतिनियुक्त केलेले महानगरपालिका कर्मचारी सर्वसामान्य अटींच्या अधिन राहून महानगरपालिकेतील सन 2025-2026 वर्षातील सेवेनुसार यथाप्रमाण (Prorata) सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळण्यास पात्र असतील.

i) दि.01.04.2025 ते दि.31.10.2026 पर्यंत ज्यांचे निवृत्तीवेतन दावे मानव संसाधन कार्यप्रणालीतून निघाले आहेत त्यांचे सानुग्रह अनुदानाचे अधिदान मानव संसाधन विभागातर्फे नोव्हेंबर 2026 (Paid in December 2026) मध्ये प्रणालीत उपलब्ध असलेल्या माहितीनुसार आकारण्यात येईल.

ii) याच कालावधीतील ज्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन दावे अद्याप मानव संसाधन प्रणालीत तयार झाले नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे अनुज्ञेय असलेले सानुग्रह अनुदान संबंधित आस्थापना विभागाने परिगणन करून लेखा विभागाकडून पडताळणी करून घेऊन प्रणालीत दावा तयार करताना त्यामध्ये समाविष्ट करावे.

दोन) <u>मात्र खालील प्रकरणी हे सानुग्रह अनुदान अनुज्ञेय नाही.</u>

- दि.1.4.2026 रोजी वा त्यानंतर नियुक्त झालेले कर्मचारी
- दि.1.4.2025 पासून वा त्यापुर्वीपासून आजतागायत निलंबनाखाली असणारे कर्मचारी
- महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीतील अध्यापकीय कर्मचारी
- अंशकालीक कामगार/कर्मचारी,
- मानसेवी कर्मचारी इत्यादी.

Scanned with OKEN Scanner

तीन) <u>वेतनपत्रके तयार करण्याबाबत.</u>

1) <u>संगणकीकृत वेतनपत्रके</u>

दि.1.4.2025 ते दि.31.3.2026 या कालावधीत ज्या नियमित वेतनश्रेणीतील पूर्णवेळ महानगरपालिका कर्मचा-यांना विविध कारणांमुळे सानुग्रह अनुदान मानव संसाधन प्रणालीतून दिले गेले नसल्यास त्यांची यादी Ftp://hr.mcgm.gov.in/HR Related Documents/2026 या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल. संबंधित आस्थापना विभागाने त्यांच्या कर्मचाऱ्यांची सानुग्रह अनुदानाची अनुज्ञेयता पडताळून त्याचप्रमाणे सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधित लेखा विभागाकडून पडताळून घेऊन नंतर (Manual Input) द्वारे मानव संसाधन प्रणालीत भरावी.

2) <u>हाती तयार केली जाणारी वेतनपत्रके (रोखीने अधिदान)</u>

आता सर्व प्रकारच्या कर्मचा-यांचे मासिक वेतन संगणकाद्वारे करण्यात येत आहे. नियमित वेतनश्रेणीमधील जे कर्मचारी संगणकप्रणालीद्वारे मासिक वेतन प्राप्त करण्यापुर्वी हाती तयार करण्यात येत असलेल्या वेतनपत्रकाद्वारे वेतन घेत होते त्यांच्याबाबतीत वरील क्र. एक (2) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाची रक्कम सोबतच्या शिघ्रगणकाच्याआधारे कर्मचा-याने दि.1.4.2025 ते 31.3.2026 किंवा त्यांचे वेतन संगणकीय वेतनपत्रकात वेतन आकारणी करण्याच्या आधीच्या दिवसापर्यंतच्या कालावधीतील जी तारीख आधीची असेल तोपर्यंत तसेच हंगामी /मोसमी कामगारांचे बाबतीत सानुग्रह अनुदानाची रक्कम प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसांच्या आधारावर परिगणित करुन त्याची पुरवणी वेतनपत्रके संबंधित लेखा विभागात पडताळणी व अधिदानासाठी त्वरीत सादर करावीत.

चार) <u>सर्वसाधारण सूचनाः</u>

अ) सदरची सानुग्रह अनुदानाची रक्कम चालू वित्तीय वर्षाच्या आयकर परिगणनेसाठी विचारात घेण्यात येईल. मात्र व्यवसाय करासाठी ही रक्कम विचारात घेऊ नये.

ब) सानुग्रह अनुदानाचे अधिदान दिवाळीपूर्वी तातडीने करावयाचे असल्याने संबंधित आस्थापना कर्मचा-यांनी अधिदानीत केलेल्या सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेची अनुज्ञेयता वरील सुचनांनुसार तपासून त्याबाबतचा

Scanned with OKEN Scanner

प्रभाव्य अहवाल (Effective Report) व यथाप्रमाण (Prorata) अधिदानानुसार काही वसुली करावयाची असल्यास त्या संबंधीची आधार सामग्री संबंधित लेखा विभागाकडे लेखा पडताळणीसाठी सादर करावी.

क) यासाठीचा खर्च खालील लेखा संकेतांकाखालील तरतुदीतून भागविण्यात यावा.

1. Account Code: 210100102 Account Head: Exgratia (Supervisory and Subordinate)

2. Account Code: 210100202 Account Head: Exgratia (Labour, Technical and others)

सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, परिपत्रकातील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित आस्थापना कर्मचा-यांना दयावेत.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या intranet वर http://mybmcemp.mcgm.gov.in या संकेतस्थळावर Circular/HR Circulars/GAD/Dy.C.A.Estt./Rgcell येथे उपलब्ध आहे.

सही/- दि.28.10.2026	सही/- दि.28.10.2026	सही/- दि.28.10.2026
श्रीम.रोहिणी खानोलकर	श्री. अरुण जाधव	श्री.किशोर गांधी
उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) प्र.	प्रमुख लेखापाल (वित्त)	उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

सही/- दि.28.10.2026	सही/- दि.28.10.2026
श्री.देविदास क्षीरसागर	डॉ.विपिन शर्मा
सह आयुक्त (वित्त)	अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- दि.29.10.2026
श्रीम.अश्विनी भिडे
मा.महानगरपालिका आयुक्त

Scanned with OKEN Scanner

परिपत्रक

2026-27

क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/06 दि.29.10.2026

प्रत _____ यांना (_____ ज्यादा प्रतींसह) माहितीकरिता आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

29/10/2026

उप प्रमुख लेखापाल (आस्था-2) यांजकरीता

Scanned with OKEN Scanner

जोडपत्र-अ

Ex-gratia Amount Rs. 33000

Worked Days	Amount	Worked Days	Amount	Worked Days	Amount	Worked Days	Amount	Worked Days	Amount	Worked Days	Amount
1	90	62	5605	123	11121	184	16636	245	22151	306	27666
2	181	63	5696	124	11211	185	16726	246	22241	307	27756
3	271	64	5786	125	11301	186	16816	247	22332	308	27847
4	362	65	5877	126	11392	187	16907	248	22422	309	27937
5	452	66	5967	127	11482	188	16997	249	22512	310	28027
6	542	67	6058	128	11573	189	17088	250	22603	311	28118
7	633	68	6148	129	11663	190	17178	251	22693	312	28208
8	723	69	6238	130	11753	191	17268	252	22784	313	28299
9	814	70	6329	131	11844	192	17359	253	22874	314	28389
10	904	71	6419	132	11934	193	17449	254	22964	315	28479
11	995	72	6510	133	12025	194	17540	255	23055	316	28570
12	1085	73	6600	134	12115	195	17630	256	23145	317	28660
13	1175	74	6690	135	12205	196	17721	257	23236	318	28751
14	1266	75	6781	136	12296	197	17811	258	23326	319	28841
15	1356	76	6871	137	12386	198	17901	259	23416	320	28932
16	1447	77	6962	138	12477	199	17992	260	23507	321	29022
17	1537	78	7052	139	12567	200	18082	261	23597	322	29112
18	1627	79	7142	140	12658	201	18173	262	23688	323	29203
19	1718	80	7233	141	12748	202	18263	263	23778	324	29293
20	1808	81	7323	142	12838	203	18353	264	23868	325	29384
21	1899	82	7414	143	12929	204	18444	265	23959	326	29474
22	1989	83	7504	144	13019	205	18534	266	24049	327	29564
23	2079	84	7595	145	13110	206	18625	267	24140	328	29655
24	2170	85	7685	146	13200	207	18715	268	24230	329	29745
25	2260	86	7775	147	13290	208	18805	269	24321	330	29836
26	2351	87	7866	148	13381	209	18896	270	24411	331	29926
27	2441	88	7956	149	13471	210	18986	271	24501	332	30016
28	2532	89	8047	150	13562	211	19077	272	24592	333	30107
29	2622	90	8137	151	13652	212	19167	273	24682	334	30197
30	2712	91	8227	152	13742	213	19258	274	24773	335	30288
31	2803	92	8318	153	13833	214	19348	275	24863	336	30378
32	2893	93	8408	154	13923	215	19438	276	24953	337	30468
33	2984	94	8499	155	14014	216	19529	277	25044	338	30559
34	3074	95	8589	156	14104	217	19619	278	25134	339	30649
35	3164	96	8679	157	14195	218	19710	279	25225	340	30740
36	3255	97	8770	158	14285	219	19800	280	25315	341	30830
37	3345	98	8860	159	14375	220	19890	281	25405	342	30921
38	3436	99	8951	160	14466	221	19981	282	25496	343	31011
39	3526	100	9041	161	14556	222	20071	283	25586	344	31101
40	3616	101	9132	162	14647	223	20162	284	25677	345	31192
41	3707	102	9222	163	14737	224	20252	285	25767	346	31282
42	3797	103	9312	164	14827	225	20342	286	25858	347	31373
43	3888	104	9403	165	14918	226	20433	287	25948	348	31463
44	3978	105	9493	166	15008	227	20523	288	26038	349	31553
45	4068	106	9584	167	15099	228	20614	289	26129	350	31644
46	4159	107	9674	168	15189	229	20704	290	26219	351	31734
47	4249	108	9764	169	15279	230	20795	291	26310	352	31825
48	4340	109	9855	170	15370	231	20885	292	26400	353	31915
49	4430	110	9945	171	15460	232	20975	293	26490	354	32005
50	4521	111	10036	172	15551	233	21066	294	26581	355	32096
51	4611	112	10126	173	15641	234	21156	295	26671	356	32186
52	4701	113	10216	174	15732	235	21247	296	26762	357	32277
53	4792	114	10307	175	15822	236	21337	297	26852	358	32367
54	4882	115	10397	176	15912	237	21427	298	26942	359	32458
55	4973	116	10488	177	16003	238	21518	299	27033	360	32548
56	5063	117	10578	178	16093	239	21608	300	27123	361	32638
57	5153	118	10668	179	16184	240	21699	301	27214	362	32729
58	5244	119	10759	180	16274	241	21789	302	27304	363	32819
59	5334	120	10849	181	16364	242	21879	303	27395	364	32910
60	5425	121	10940	182	16455	243	21970	304	27485	365	33000
61	5515	122	11030	183	16545	244	22060	305	27575		

Scanned with OKEN Scanner